**रे.के.नं. २३३/२०२२**
**नि.क्र. १७/क**

अभियोगपक्षातर्फे **साक्षीदार क्र. २** याची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | हेमंत दिलीप सोंडकर, |
| वय | - | ३१ वर्षे |
| व्यवसाय | - | व्यापार, |
| राहणार | - | डाउरनगर, ता. उरण, जि. रायगड. |

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. बी. देशमाने यांच्याद्वारे**

१. दिनांक २९.०४.२०२२ रोजी मला पोलीसांनी उरण पोलीस ठाण्यात बोलावले होते. त्यांनी मला चोरी झालेल्या घटनेसंबंधी बोलवले होते. मला घटनेबाबत आठवण करून दिल्यास बरीच वर्षे झाल्याने सांगता येणार नाही.

**साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी वकिलांनी सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. करीता सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीस अधिकारी श्री. राजवाडे यांनी बिअर शॉपी येथे चोरी झालेल्या घटनेसंबंधी पंचनामा करणेकामी बोलवले होते. त्यावेळी तेथे त्या बिअर शॉपीचे मालक होते. तसेच दुसरा पंच नितीन हजर होता. हे म्हणणे खरे आहे की, रूपये २८८१०/- एवढ्या रक्कमेचा मुद्देमाल चोरी झाल्याचे

सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबतचा घटनास्थळ पंचनामा आम्हा पंचांसमक्ष पोलीसांनी तयार करून त्यावर माझी सही घेतली होती. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर माझी अनुक्रमांक २ वर सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. करीता सदर पंचनाम्याला **निशाणी क्र. पी ३ पीडब्ल्यु २** देण्यात येतो.

**आरोपी व त्यांचे वकिलांचा पुकारा केला असता गैरहजर. करीता फौजदार प्रक्रिया संहितेच्या कलम ३०९ अंतर्गत पुरावा बंद करण्यास सबळ कारण असल्याने आरोपीतर्फे उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/-**

**उरण,** **(एस.पी. वानखडे )**

**दिनांक – १८/०७/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.१ उरण**